**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)**
यांचे कार्यालय
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
अंधेरी पोलीस ठाणे आवार, अंधेरी (पुर्व),
मुंबई - ४०० ०६९.

दूरध्वनी क्र. ०२२-२६८३३०५४
**Email : dcpdetection1.mum@mahapolice.gov.in**

# प्रेस नोट

**कक्ष - ७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई** **दिनांक ०४/०८/२०२२**

## मुंबईतील वेगवेगळ्या ठिकाणी चालु असलेल्या ०४ बेकायदा ऑनलाईन लॉटरी सेंटरवर कारवाई

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष - ७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई |
| पोलीस ठाणे | पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई. |
| गु.र.क्र व कलम | गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. ३५/२०२२, कलम ४ (अ), ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सह कलम ४ (१), ७ (३), ८, ९ लॉटरी रेग्युलेशन अधिनियम (पंतनगर पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र. ८९/२०२२) |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०३/०८/२०२२ रोजी १७.३० वा. ते दिनांक ०४/०८/२०२२ रोजी ०४.२० वा. चे दरम्यान |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०४/०८/२०२२ रोजी ०७.१५ वाजता |
| फिर्यादीचे नाव | श्री दिपक पुरुषोत्तम पवार, पो.ह.क्र. ३१३४७,<br>कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई. |
| घटनास्थळ | १) विनस्टार जुगार सेंटर, निराधार सोसायटी, स्टेशन रोड, पंतनगर, घाटकोपर पुर्व, मुंबई,<br>२) शॉप नं. ०५, बिल्डींग नं. १८४ च्या समोर, जवाहर रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या जवळ, आरती ब्युटी सेंटच्यालगतचा गाळा, घाटकोपर पुर्व, मुंबई<br>३) शॉप नं. ०९, बिल्डींग नं. १८४, जवाहर रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या जवळ, घाटकोपर पुर्व, मुंबई<br>४) शॉप नं. १५, बिल्डींग नं. १८४ च्या समोर, जवाहर रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या जवळ, घाटकोपर पुर्व, मुंबई |
| हस्तगत मालमत्ता | रोख रक्कम रू. ६७,८१०/-,<br>अं.किं.रू. ५०,०००/- चे एकणु ०५ मोबाईल,<br>अं.किं.रू. २०,०००/- चे एकुण ०४ सी.पी.यु.,<br>अं.किं.रू. २०,०००/- चे एकुण ०५ मॉनिटर,<br>तसेच प्रिंन्टर,की बोर्ड, राऊटर, ऑनलाईन लॉटरी निकालाचे चार्ट व इतर साहित्य |
| अटक आरोपीतांची संख्या | मालक :- ०१<br>चालक :- ०६<br>गिऱ्हाईकांची संख्या :- ०९<br>पाहिजे आरोपी (मालक) :- ०३ |

| | |
|---|---|
| थोडक्यात प्रेस नोट | पंतनगर पोलीस ठाणेच्या हद्दीत बिल्डींग नं. १८४ च्या समोर, जवाहर रोड, घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या जवळ, घाटकोपर (पुर्व), मुंबई या ठिकाणी एकुण ०४ गाळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदा ऑनलाईन लॉटरी व्यवसाय चालु असल्याबाबत **सहाय्यक पोलीस आयुक्त, डी पुर्व, गुन्हे शाखा, मुंबई** यांना गोपनिय माहिती प्राप्त झाली. सदरबाबत शहानिशा करून कारवाई करणेबाबत मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी पुर्व, गुन्हे शाखा, मुंबई यांनी आदेशित केले.<br><br>सदरबाबत प्र.पो.नि. सुधीर जाधव यांनी श्री चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-पुर्व यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाची नियुक्ती करून नियोजनबध्द छापा कारवाईची योजना आखली.<br><br>दिनांक ०३/०८/२०२२ रोजी कक्ष - ७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई येथील पथकाने पंतनगर पोलीस ठाणे हद्दीत वर नमुद एकुण ०४ ठिकाणी छापा टाकला असता सदर ठिकाणी १)'Canasta (स्कील गेम)', २)'Balaji Win Game', ३) G-C ऑनलाईन लॉटरी, ४) 'PLAY 2 Win' या प्रकारच्या बेकायदा ऑनलाईन लॉटरी सेंटर चालविल्याचे व त्यासाठी कोणतेही कायदेशिर परवाने न घेता सॉफ्टवेअर तयार करून अज्ञात ठिकाणी सर्वर/नियंत्रण कक्ष तयार करून त्या ठिकाणाहुन प्रत्येक १५ मिनीटांनी लॉटरीचे निकाल इंटरनेटव्दारे प्रसारीत केले व स्वत:च्या फायद्यासाठी बेकायदेशिर ऑनलाईन लॉटरी माध्यमातुन जुगार खेळविले असल्याबाबत पथकाचे खातरजमा झालेवरून सदर ठिकाणी मिळुन आलेले लॉटरी मालक, चालक, गिऱ्हाईक असे एकुण १६ इसमांना ताब्यात घेण्यात आले. बेकायदा ऑन लाईन लॉटरी सेंटर चालविणेकरीता वापरण्यात आलेले ०५ मोबाईल, ०४ सी.पी.यु, ०५ मॉनिटर, प्रिंन्टर, की बोर्ड, राउटर, ऑन लॉटरी निकालाचे चार्ट व इतर साहित्य तसेच एकुण रोख रक्कम रू. ६७,८१०/- जप्त करण्यात आले.<br><br>सदर ठिकाणी आरोपीत इसम हे कोणतेही कायदेशिर परवाने न घेता ऑनलाईन लॉटरी सेंटर चालविताना व खेळताना मिळुन आल्याने त्यांचे विरोधात पंतनगर पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. ८९/२०२२ कलम ४ (अ), ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सह कलम ४ (१), ७ (३), ८, ९ लॉटरी रेग्युलेशन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांच्या आदेशाने पुढील तपासकामी कक्ष - ७, गुन्हे शाखा, घाटकोपर, मुंबई यांचेकडे घेवुन त्याची नोंद गु.प्र.शा, वि स्था.गु.र.क्र. ३५/२०२२ अन्वये घेण्यात आली आहे. नमुद गुन्ह्यात वर नमुद प्रमाणे एकुण १६ इसमांना अटक करण्यात आली असुन नमुद गुन्ह्याचा तपास चालु आहे. |
| सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) गुन्हे शाखा, श्री संग्रामसिंह निशाणदार, **सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पुर्व), श्री चंद्रकांत जाधव** यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली सदर कारवाईमध्ये **प्र.पो.नि. सुधीर जाधव, स.पो.नि. ओलेकर, पो.उ.नि. धोत्रे, पो.उ.नि. काळे, पो.उ.नि. शेलार, पो.उ.नि. परबळकर, पो.ह.क्र. ३१३४७/पवार,** पो.ह.क्र. ९६०५५२/कांबळे, पो.ह.क्र. ३२८०७/गुरव, पो.ह.क्र. ९७०६५१/जोशी, पो.ह.क्र. ००३५१/शिरापुरी, पो.ह.क्र. ००७४०/शिंदे, **पो.ना.क्र. ०३४६७/गलांडे**, पो.ना.क्र. ०३८३५/जाधव, पो.शि.क्र. ०७१०७४/शिंदे, पो.शि.क्र. ०८०७७०/खरे, पो.शि.क्र. ०८०५००/सय्यद, पो.शि.क्र. ०९२८८२/पाटील, पो.ह.चा.क्र. ९८०८०७/धुमाळ, पो.शि.चा.क्र. १५०८६३/राठोड यांनी पार पाडली. | |

*****D-1/22/2022*****